# ई - पोलीस पत्रिका

दिनांक १०/०१/२०२५ अनु.क्र. ०८/२५

**(अमरावती शहर पोलीसांची २०२५ ची उद्दिष्टे)**

- **नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.**
- **उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.**
- **महीला, मुले व जेष्ठ नागरिकांचीसुरक्षा.**
- **जातीयसलोखा वाढविणे.**
- **संघटितगुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.**
- **रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.**
- **पोलीस कोठडीत गुन्हे घडु न देणे.**
- **आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.**
- **"सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.**

# भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## पदोन्नती

**१.पोआअ/प्रलि.-आस्था/श्रेणी पोउपनि/१३२/२०२५ अमरावती शहर दिनांक ०६/०१/२०२५**

संदर्भ :- १. शासन निर्णय, गृह विभाग शा.नि.क्र. पीएमएन-०८२१/प्र.क्र.५३३/पोल-५ब, दि.२५/०२/२०२२
२. अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) यांचे पत्र क्र.पोमसं/६/पदोन्नती/ग्रेड पीएसआय/३४/२०२२, दि.२८.०३.२०२२ व दि.०७.०४.२०२२

### आदेश

शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक :- पीएमएन-०८२१/प्र.क्र.५३३/पोल-५,ब दिनांक २५/०२/२०२२ अन्वये तसेच वरील संदर्भ क्र.२ चे पत्रानुसार पोलीस आयुक्त, अमरावती शहर या आस्थापनेवरील पोलीस दलामध्ये ३० वर्षे सेवा पुर्णकेलेले, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (ASI) या पदावर किमान ३ वर्षे सेवा केलेले आणि आश्वासित प्रगती योजनेनुसार पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या पदाची वेतन श्रेणी घेत असलेले (म्हणजेच ज्या सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक यांचे मुळ वेतन पोलीस उप निरीक्षक पदाचे वेतन श्रेणीतील वेतनस्तर एस-१४, रु.३८६००/- पेक्षा जास्त आहे.) असेतीनही निकष पुर्णकरणाऱ्या खालीलसहाय्यक पोलीस उप निरीक्षक यांना "**श्रेणी पोलीस उप निरीक्षक ( Grade PSI )**" असे संबोधण्यात येत आहे.

| अ.क्र | पदनाम | ब.न. | नाव | सध्याची नियुक्ती |
|---|---|---|---|---|
| १ | ASI | ११४८ | संजय प्रल्हादराव पवार | पो.स्टे.गाडगेनगर |
| २ | ASI | ११२६ | मनोहर धनसिंग राठोड | पो.मुख्यालय |
| ३ | ASI | ३२६ | गजानन लक्ष्मण झोडपे | पो.स्टे.वलगाव |
| ४ | ASI | १२१९ | सुनिल मानसु मेटकर | महीलासेल |
| ५ | ASI | १५०१ | अब्दुल आबीद शेख रसीद | पो.स्टे.नागपुरीगेट |
| ६ | ASI | १७७० | शब्बीर अहमदखान जलालखान | शवाशा (पश्चिम) |

वरील नमुदश्रेणी पोलीस उपनिरीक्षकहे सद्य: ज्या ठिकाणी नेमणूकीस आहेत त्याच ठिकाणीकार्यरत राहतील. तसेच त्यांना नियमित पोलीस उप निरीक्षकाची पदोन्नती मिळेपर्यंततेसहाय्यक पोलीस उप निरीक्षकाचेच कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडतील .वर नमुद पोलीस अंमलदारश्रेणी पोलीस उप निरीक्षक म्हणून संबोधन करण्यात आल्यानेत्यांचे वेतनात कोणताही बदल होणार नाही.

श्रेणी पोलीस उपनिरीक्षक (Grade PSI) म्हणून संबोधन केवळ वैयक्तिकरित्या राहील व संबधित सहायक पोलीस उप निरीक्षक यांचे सेवानिवृत्ती पर्यंत किवा ते पोलीस उप निरीक्षक पदावर नियमित पदोन्नतीहोईपर्यंत लागु राहील.

शासन निर्णय, गृह विभाग शा.नि.क्र. पीएमएन-०८२१/प्र.क्र.५३३/पोल-५ब, दि.२५/०२/२०२२ अन्वये वरील श्रेणी पोलीस उपनिरीक्षक (Grade PSI) यांच्या गणवेशात अतिरिक्त एकस्टार समाविष्ठ करण्यात यावा.

उपरोक्त नमूद केलेल्या श्रेणी पोलीस उप निरीक्षकापैकी एखादया विरुध्द आता गुन्हा दाखल झाला असेल/ निलंबनाची कार्यवाही केली असेल/ न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल /विभागीय चौकशी अगर शिस्त भंग विषयक कार्यवाही चालु असेल किंवा ते एखादी शिक्षा उपभोगत असतीलतरअशा श्रेणी पोलीस उप निरीक्षकाची सवित्तर माहीती प्रभारी अधिकारी यांनी या कार्यालयाततात्काळसादर करावी.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## शिक्षा

**१.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/गुन्हे प्रलंबित/अंतिम आदेश/मपोहवा-१०७६ लांजेवार/१०७६० /२०२४ अमरावती शहर दिनांक १२/१२/२०२४**

**संदर्भ क्रमांक :-** १) पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, अमरावती शहर यांचे पत्र क्रमांक पोउपआ/परि-१/ कसुरी अह./१२६/२०२४, दिनांक २४/०१/२०२४

२) सहायक पोलीस आयुक्त, गाडगे नगर विभाग, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक १०४/२०२४, दिनांक ०९/०१/२०२४

३) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/गुन्हे प्रलंबित/का.दा.नो./पोहवा-१०७६ लांजेवार/२४२१/२०२४, दिनांक ०४/०३/२०२४

**कसुरदारचे नाव :-** मपोहवा/१०७६ अनिता लांजेवार, नेमणुकपोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही पोहवा/१०७६ अनिता लांजेवार, पोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुमच्या कडे पोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर येथील सन २०२३ मधील ०१ महिण्यावरील ०८ व सन २०२२ मधील ०१ वर्षावरील ११ असे एकुण १९ गुन्हे खालील प्रमाणे प्रलंबित आहेत.

तुम्ही गुन्हयांचा योग्य तपास व मुदतीत गुन्हयांची निर्गती या दोन्ही बाबतीत गंभीर निष्काळजीपणा केला आहे. तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले असुन वरिष्ठ अधिकारी यांनी तुम्हाला दिलेल्या सुचनांकडे दुर्लक्ष केले आहे. तरी तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे असुन तुम्ही तुमचे कर्तव्यात निष्काळजीपणा/बेजबाबदारपणा केला असुन गुन्हे प्रलंबित ठेवुन कर्तव्यात कसुर केलेला आहे.

| अ.क्र. | अप. क्र. | कलम | दाखल दिनांक | ०१ महिने वरील | ०१ वर्षावरील |
|---|---|---|---|---|---|
| १ | ७९०/२०२२ | ३५४,४५२,५०६ | १२/०७/२०२२ | - | ०१ |
| २ | १०५१/२०२२ | ३५४(ड),५०६(२) | ०९/०९/२०२२ | - | ०१ |
| ३ | ११२१/२०२२ | २९४,५०६ | २२/०९/२०२२ | - | ०१ |
| ४ | ११३१/२०२२ | ३५४,४५२,५०४,५०६ | २४/०९/२०२२ | - | ०१ |
| ५ | ११५८/२०२२ | २९४,५०६ | २८/०९/२०२२ | - | ०१ |
| ६ | ११८०/२०२२ | ३५४ड,५०६(२) | ०४/१०/२०२२ | - | ०१ |
| ७ | ११९३/२०२२ | ३५४ड, | ०६/१०/२०२२ | - | ०१ |
| ८ | १२९२/२०२२ | ४९८(अ) | ०२/११/२०२२ | - | ०१ |
| ९ | १३१४/२०२२ | ३५४(ड),२९४,५०६(२) | ०६/११/२०२२ | - | ०१ |
| १० | १३४९/२०२२ | ३५४,२९४,३२४,३४ | १५/११/२०२२ | - | ०१ |
| ११ | १३९६/२०२२ | ३५४(अ),२९४,३२३ | २३/११/२०२२ | - | ०१ |
| १२ | १३/२०२३ | ३५४(अ),३५४(ड) | ०४/०१/२०२३ | ०१ | - |
| १३ | २०/२०२३ | ३५४,२९४,३२३,५०६,४२७,३४ | ०५/०१/२०२३ | ०१ | - |
| १४ | २२/२०२३ | ३५४(ड),५०६,५००,५०१ | ०५/०१/२०२३ | ०१ | - |
| १५ | ४५/२०२३ | ३५४,५०९, ५०४,३४ ५०६(ब) | ०८/०१/२०२३ | ०१ | - |
| १६ | ६४/२०२३ | ३५४ड,५०४,५०६ | १२/०१/२०२३ | ०१ | - |
| १७ | ९९/२०२३ | ३५४ड,५०४,५०६ | २०/०१/२०२३ | ०१ | - |

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता)** का रोखण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले असुन तुम्हाला तुमचे मौखीक म्हणणे मांडण्यासाठी आमचे आज्ञांकित कक्षात या कार्यालयाचे बिनतारी संदेश क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/आज्ञांकित कक्ष/१००/२०२४, दिनांक २४/०९/२०२४ अन्वये दिनांक २५/०९/२०२४ रोजी तुम्हाला बोलाविण्यात आले असता तुम्ही आज्ञांकित कक्षात हजर झाले असुन सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे अवलोकन करुन तुम्हास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **"सक्त ताकीद"**ही शिक्षा देण्यात येत आहे.

**२.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/गुन्हे प्रलंबित/अंतिम आदेश/पोहवा-१०५८ नेताम/१०७६३/२०२४**
**अमरावती शहर दिनांक १२/१२/२०२४**

**संदर्भ क्रमांक :-** १) पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, अमरावती शहर यांचे पत्र क्रमांक पोउपआ/परि-१/कसुरी अह./१२६/२०२४, दिनांक २४/०१/२०२४

२) सहायक पोलीस आयुक्त, गाडगे नगर विभाग, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक१०४/२०२४, दिनांक ०९/०१/२०२४

३) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/गुन्हे प्रलंबित/का.दा.नो./पोहवा-१०५८ नेताम/२४२७/२०२४, दिनांक ०४/०३/२०२४

**कसुरदारचे नाव :-** पोहवा/१०५८ उमेश नेताम, नेमणुकपोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुरी:-**

तुम्ही पोहवा/१०५८ उमेश नेताम, पोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुमच्या कडे पोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर येथील सन २०२०, २०२१ व २०२२ मधील ०१ वर्षावरील एकुण १६ गुन्हे खालील प्रमाणे प्रलंबित आहेत.

तुम्ही गुन्हयांचा योग्य तपास व मुदतीत गुन्हयांची निर्गती या दोन्ही बाबतीत गंभीर निष्काळजीपणा केला आहे. तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले असुन वरिष्ठ अधिकारी यांनी तुम्हाला दिलेल्या सुचनांकडे दुर्लक्ष केले आहे. तरी तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे असुन तुम्ही तुमचे कर्तव्यात निष्काळजीपणा/बेजबाबदारपणा केला असुन गुन्हे प्रलंबित ठेवुन कर्तव्यात कसुर केलेला आहे.

| अ.क्र. | अप क्र. | कलम | दाखल दिनांक | ०१ वर्षावरील |
|---|---|---|---|---|
| १ | २६७/२०२० | ४,२५ आर्म ॲक्ट | २२/०३/२०२० | ०१ |
| २ | ५३८/२०२० | १८८ भादवी | ०४/०७/२०२० | ०१ |
| ३ | ११०४/२०२० | २७९,३३७,३३८ | १०/१२/२०२० | ०१ |
| ४ | ५६/२०२१ | २७९,३३७ | १६/०१/२०२१ | ०१ |
| ५ | २८८७/२०२१ | ४३५,४२७, | २४/११/२०२१ | ०१ |
| ६ | ७५/२०२२ | ४५२,२९४,५०६ब | १३/०१/२०२२ | ०१ |
| ७ | १६०/२०२२ | ३२४,५०४,५०६,४२७ | ०५/०२/२०२२ | ०१ |
| ८ | ५७१/२०२२ | ३२४,२९४,५०६ | २०/०५/२०२२ | ०१ |
| ९ | ६२५/२०२२ | २७९,३३७ | ०२/०६/२०२२ | ०१ |
| १० | ७४३/२०२२ | २७९,३३७,४२७,५०६,३४ | ०१/०७/२०२२ | ०१ |
| ११ | ८२९/२०२२ | २७९,३३७ | २५/०७/२०२२ | ०१ |
| १२ | ९२३/२०२२ | ३२४,३४ | १७/०८/२०२२ | ०१ |
| १३ | ११३५/२०२२ | १२ जुगार कायदा | २५/०९/२०२२ | ०१ |
| १४ | १३२८/२०२२ | २९४,५०६(२) | ०९/११/२०२२ | ०१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | १३४३/२०२२ | ३७९ | १४/११/२०२२ | ०१ |
| १६ | १५१९/२०२२ | ४०८ | २२/१२/२०२२ | ०१ |

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता)** का रोखण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केले नसल्याने पुन्हा संधीचे पत्र क्रमांक ४२२२/२०२४, दिनांक ३०/०४/२०२४ अन्वये संधी देण्यात आली असुन स्पष्टीकरण सादर केल्याने पुन्हा संधीचे पत्र क्रमांक ६८३४/२०२४, दिनांक २९/०७/२०२४ अन्वये पत्र देण्यात आलेले असुन तुम्ही स्पष्टीकरण सादर न केल्याने तुम्हाला तुमचे मौखीक म्हणणे मांडण्यासाठी आमचे आज्ञांकित कक्षात या कार्यालयाचे बिनतारी संदेश क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/आज्ञांकित कक्ष/१००/२०२४, दिनांक २४/०९/२०२४ अन्वये दिनांक २५/०९/२०२४ रोजी तुम्हाला बोलाविण्यात आले असता तुम्ही आज्ञांकित कक्षात हजर सुध्दा झाले नाही. तरी तुम्हास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **"सक्त ताकीद"**ही शिक्षा देण्यात येत आहे.

## बक्षिस

**१.पोआअ/आस्था-८/ बक्षीस /९९०५/२०२४ अमरावती शहर दिनांक १९/११/२०२४**

## आदेश

शासन निर्णय गृह विभाग क्र. एडब्ल्युडी-०११५/प्र.क्र.२६८/पोल-१ दिनांक २९/११/२०१८ अन्वये प्रदान केलेल्या शक्तीच्या अधिन राहुन मी पोलीस उप-आयुक्त (मुख्या.) अमरावती शहर, खालील नमुद पोलीस अधिकारी व अंमलदार यांना त्यांचे **उत्कृष्ट** कामगिरी बाबत बक्षिस मंजुर करीत आहे .

| अ. क | पदनाम/ब.क्र./नाव | नेमणुक | विवरण | बक्षिस | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | बक्षीस | सी नोट |
| १ | नापोकॉ/१०केशव | मो.परि. विभाग | दिनांक ०४/०४/२०२४ रोजी मा.खासदार श्रीमती नवनित राणा यांचे नामांकन फॉर्म भरण्याकरीता उपस्थित मा.उपमुख्यमंत्री दौरा बंदोबस्ता बाबत. | २०० | जिएसटि |
| २ | पोकॉ/३२० धर्मा | पो.स्टे.फ्रेजरपुरा | | २०० | जिएसटि |
| ३ | पोकॉ/६१२ धर्मन्द्र | मो.परि.विभाग | | २०० | जिएसटि |
| ४ | पोकॉ/३७८ अर्जुन | पो.मुख्यालय | | २०० | जिएसटि |
| ५ | नापोकॉ/१०केशव | मो.परि. विभाग | दिनांक २६/०४/२०२४ रोजी लोकसभा निवडणुक मध्ये कोणताही कायदा व सुव्यवस्थेतचा प्रश्न निर्माण न होता शांततेत बंदोबस्त केल्या बाबत. | २०० | जिएसटि |
| ६ | पोकॉ/३२० धर्मा | पो.स्टे.फ्रेजरपुरा | | २०० | जिएसटि |
| ७ | पोकॉ/६१२ धर्मन्द्र | मो.परि.विभाग | | २०० | जिएसटि |
| ८ | पोकॉ/३७८ अर्जुन | पो.मुख्यालय | | २०० | जिएसटि |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | नापोकॉ/१०केशव | मो.परि. विभाग | दिनांक २४/०४/२०२४ रोजी मा.श्री अमितजी शहा (गुहमंत्री)यांचे लोकसभा निवडणुक चे अनुषंगाने जाहीर सभा बदोबस्त बाबत. | २०० | जिएसटि |
| १० | पोकॉ/३२० धर्मा | पो.स्टे.फ्रेजरपुरा | | २०० | जिएसटि |
| ११ | पोकॉ/६१२ धर्मन्द्र | मो.परि.विभाग | | २०० | जिएसटि |
| १२ | पोकॉ/३७८ अर्जुन | पो.मुख्यालय | | २०० | जिएसटि |
| १३ | नापोकॉ/१०केशव | मो.परि. विभाग | दिनांक २३/०४/२०२४ रोजी श्री हनुमान जयंती निमीत्त बंदोबस्त दरम्यान कोणताही कायदा व सुव्यवस्थेतचा प्रश्न निर्माण न होता शांततेत बदोबस्त केल्या बाबत. | २०० | जिएसटि |
| १४ | पोकॉ/३२० धर्मा | पो.स्टे.फ्रेजरपुरा | | २०० | जिएसटि |
| १५ | पोकॉ/६१२ धर्मन्द्र | मो.परि.विभाग | | २०० | जिएसटि |
| १६ | पोकॉ/३७८ अर्जुन | पो.मुख्यालय | | २०० | जिएसटि |
| १७ | पोउपनि/विलास जामनेकर | पो.उप.परि.कार्या-२ | दिनांक २६/०४/२०२४ रोजी लोकसभा निवडणुक मध्ये कोणताही कायदा व सुव्यवस्थेतचा प्रश्न निर्माण न होता शांततेत बंदोबस्त केल्या बाबत. | ५०० | सि नोट |
| १८ | पोहेकॉ/५७ शरद धुर्व | पो.स्टे.खोलापुर | | ३०० | जिएसटि |
| १९ | पोहवा/९०चंद्रपाल | पो.स्टे.भातकुली | | ३०० | जिएसटि |
| २० | पोकॉ/३३३ संतोष मुडे | पो.स्टे.कोतवाली | | ३०० | जिएसटि |
| २१ | पोकॉ/५०८ संदीप | पो.मुख्यालय | | ३०० | जिएसटि |
| | **एकुण** | | **चार हजार नउशे रुपये फक्त** | **४,९००/-** | **--** |

प्रमाणित करण्यांत येते की, शासन निर्णय गृह विभाग क्र. एडब्ल्युडी-०११५/प्र.क्र.२६८/पोल-१ दिनांक २९/११/२०१८ मुंबई पोलीस नियमावली १९५९ चा भाग - १ नियम ३०० मधील विहीत तरतुदीनुसार रोख रक्कम मंजुर करण्यांत आली आहे.

## <u>सेवानिवृत्त</u>

**१.जा.क्र.पोआअ/पशा-१/विवयो-सेनि./पो.अधिकारी/१०७४७/२०२४ अमरावती दि.१२/१२/२०२४**

### आदेश

श्री.नितीन गंगाधर इसोकार, पोलिस उपनिरीक्षक, विशेष शाखा, अमरावती शहर यांची जन्म दि.०३/१२/१९६६ आहे. श्री.नितीन गंगाधर इसोकार, पोलिस उपनिरीक्षक हे दि.०३/१२/२०२४ रोजी वयाची ५८ वर्षे पुर्ण करीत असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) १९८२ मधील नियम १० (१) अन्वये दि.३१/१२/२०२४ रोजी मा.नं.पासुन नियत वयोमानुसार शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त करण्यात येत आहे.

**२.जा.क्र.पोआअ/पशा-१/विवयो-सेनि./पो.अधिकारी/१०७४८/२०२४ अमरावती दि.१२/१२/२०२४**

### आदेश

श्री.सुनिल दयारामजी खंडारे, पोलिस उपनिरीक्षक, पो.स्टे.नांदगाव पेठ, अमरावती शहर यांची जन्म दि.१६/१२/१९६६ आहे. श्री.सुनिल दयारामजी खंडारे, पोलिस उपनिरीक्षक, हे दि.१६/१२/२०२४ रोजी वयाची ५८ वर्षे पुर्ण करीत असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) १९८२ मधील नियम १० (१)

अन्वये दि.३१/१२/२०२४ रोजी मा.नं.पासुन नियत वयोमानुसार शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त करण्यात येत आहे.

# भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**१.पोआअ/प्रलि-आस्था/अनुकंपा पोलीस भरती-२०१३/१०१/२०२४अमरावती शहर दिनांक ०१/०१/२०२५**

**नियुक्ती आदेश**

शासन निर्णय अनुकंपा -१०९५/प्र.क्र.३४-अ/आठ दिनांक २३.०८.१९९६ व शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक/१२१७/प्र.क्र.१०२/आठ दिनांक २१.०९.२०१७ नुसार गट क मधील पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र असणा-या कर्मचा-याला पदाच्या अपलब्धते अभावी गट-ड मधील पदावर नियुक्ती दिल्यास पद उपलब्ध होताच गट क मधील पदावर त्याला प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी असे निर्देश आहेत. त्याअनुषंगाने उमेदवार श्री.निरज अशोक जामनेकर यांना या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोआअ/पशा-३/अनुकंपा नियुक्ती/भोजन सेवक/२०२३/८०३६ दि.१३.०७.२०२४ अन्वये भोजन सेवक (गट-ड) या पदावर नियुक्ती देण्यात आली असुन नियुक्ती आदेशा मध्ये त्यांचे नाव गट क करीता ठेवण्यात आलेल्या अनुकंपा ज्येष्ठता यादीमध्ये अबाधित राहील म्हणुन नमुद करण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्य पोलीस दलात पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवर पोलीस शिपाई यांची रिक्त पदे अनुकंपामधुन भरण्याकरीता महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील तरतुदीनुसार**"पोलीस शिपाई" (गट-क, अराजपत्रीत)** पदाचीपोलीसभरती २०२२-२०२३ ची प्रक्रिया राबविण्यात आली आहे. पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३ मध्येपोलीस शिपाई पदावर निवड झ ाालेलेखालील नमुदउमेदवार **चारीत्र्य पडताळणी व वैद्यकियतपासणीमध्ये**पात्रठरल्यानेत्यांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गामध्ये व महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, २०१९ अन्वये वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर. एस-७ :- २१७००-६९१००, अधीक विशेष वेतन रुपये ७५०/- (महागाई भत्ता व लागु असलेले इतर भत्त्यासह) मध्ये**"पोलीस शिपाई"** पदी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१, प्रशासन) मधील नियम ३३ मध्ये असलेल्या अधिकारानुसार**ही निव्वळतात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुनपोलीस शिपाई पदावर नियुक्ती देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | चेस्टक्रमांक | नियुक्तीचा प्रवर्ग | बक्कल क्रमांक | नियुक्ती पासुन देय वेतन | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.सतीश किशन पवार | १५२० | सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग | १४२८ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |

**अटी व शर्ती** :-

१)	उपरोक्त नमुद उमेदवारांना महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व वेळोवेळी सेवाप्रवेश नियम २०११ मध्ये झालेल्या सुधारणेच्या संपुर्णतरतुदी लागु राहतील. उमेदवारांची नियुक्ती पुर्णत:अस्थायी स्वरुपाची राहील. तसेच उमेदवारांची अर्हता व उमेदवाराने सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या आधारे पोलीस शिपाई पदावर निवडकरण्यांत आलेली आहे. त्यामुळे पोलीस भरतीच्या वेळी सादर केलेली विविध प्रमाणपत्रे, गुणपत्रिकाबनावट/खोटे असल्याचे भविष्यात आढळून आल्यास तसेच कोणतीही अनर्हता आढळून आल्यास शासकीय सेवा पुर्वसूचना न देता किंवा कोणतेही कारण न दर्शविता समाप्त करण्यांत येईल. याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२)	शासन निर्णय, वित्त विभाग क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ तरतुदीनुसार**राज्य शासनाच्या सेवेत दिनांक ०१ नोव्हेंबर २००५ किंवा त्यानंतर नियुक्तहोणाऱ्या उमेदवारांना नविन "परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना आता सुधारीत राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना" लागु ठरेल.** मात्र, सध्या अस्तित्वात  असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना १९९८ लागुहोणार नाही. तसेच वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४ दिनांक  ३१ मार्च २०२३ तरतुदीनुसार परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन  योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन  प्रणाली अंतर्गत कर्मचा-याचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांनाकुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यु उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या  कर्मचा-याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृति उपदानतसेच शासन सेवेतुन निवृत्त होणा-या कर्मचा-यांना सेवा उपदान अनुज्ञेय राहील.

३)	पूर्व चारित्र व वर्तणुक पडताळणी बाबत भरुन दिलेलासाक्षांकन फॉर्म मध्येखोटी माहिती पुरविलेली आहे किंवा वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडवुन ठेवल्याचे सेवाकाळात कधीही निदर्शनास आल्यास तसेच आपले विरुध्द फौजदारीखटले न्याय प्रविष्ठ आहेत किंवा नैतीक अंध:पतनाच्या गुन्हयात आपणास दोषी ठरवुन न्यायालयाने शिक्षा दिल्याचे किंवा पोलीस सेवेत अभियोग्य नसल्याचे आढळुन आल्यास किंवा इतर मार्गाने निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता आपली पोलीस शिपाई पदावरील सेवा समाप्त करण्यात येईल व आपणाविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

४)	तुम्हास देण्यात आलेली नियुक्तीही निव्वळ तात्पुरत्या व हंगामी स्वरुपाची असुनतुम्हासकोणत्याही प्रकारची पुर्वसुचना अथवा नोटीस न देता सेवेतुन कमीकरण्यात येईल.

५)	पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारास या पदासाठी विहीत केलेले मुलभुत प्रशिक्षण पुर्ण करावे लागेल व संबंधीत परिक्षा चारसंधीमध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल. जर चारसंधीमध्ये आपण परिक्षा उत्तीर्ण झाला नाहीतर आपली सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही. वार्षिक वेतनवाढ रोखलेले उमेदवार संबंधीत परिक्षा विहीत संधित उत्तीर्ण झाल्यास, राखुन ठेवलेली वेतनवाढ त्यास देयहोईल. परंतु वेतनवाढ रोखुन धरल्यामुळे देयहोणारी थकबाकी मिळण्याचाहक्क असणार नाही.

६)	प्रशिक्षणाच्या कालावधीत शिस्त ही अत्यंत उच्च दर्जाची राहील. वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन काटेकोरपणेहोईल याची दक्षता बाळगावी. प्रशिक्षण कालावधीत गैरशिस्तीचे वर्तन किंवा असभ्य वर्तन आढळुन आल्यास त्वरीत सेवेतुन कमीकरण्यात येईल. प्रशिक्षण कालावधीमध्येकोणत्याही प्रकारच्या रजा मिळणार नाहीतसेचसक्षम अधिकाऱ्यांच्या परवानगी शिवाय मुख्यालय परिसरसोडुन बाहेर जाता येणार नाही.

७)	हिंदी आणि मराठी भाषा परिक्षेसंबंधीच्या नियमावलीनुसार जरत्यांनी या परिक्षा अगोदरच उत्तीर्णकेल्या नसतील किंवा त्या उत्तीर्णहोण्यापासुन त्यांना सुट मिळाली नसेलतरत्यांनी एतदर्थ मंडळाची मराठी / हिंदी विषयांची परिक्षा विहीत मुदतीत उत्तीर्णहोणे आवश्यक राहील. अन्यथा तद्नंतर त्यांच्या पुढील वेतनवाढी रोखुन ठेवण्यात येईल.

८)	शासन अधिसुचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र. (१७/२०००)/बारा, दिनांक २८ मार्च २००५ चे महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ तरतुदीनुसार आपणास दिनांक २८ मार्च २००५ रोजी किंवा त्यानंतरहयात असलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत नमुना-अ नुसार विहीत प्रतिज्ञापन भरुन दयावे लागेलतसेचहयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक आढळुन आल्यास राज्य शासकिय सेवेच्या पदासाठी अनर्ह ठरविण्या००त येवुन सेवेतुन कमीकरण्यात येईल.

९)	गृह विभाग शासन पत्र क्र. पीएसबी-०३११/प्र.क्र.५२१/पोल-५ अ, दिनांक २६.०९.२०११ व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र. प्रशि/पोशि-भरती/प्रशि-खर्च वसुली/२०१२/२२३१, दिनांक २३.०४.२०१२ अन्वये पोलीस शिपाई या पदावर निवड झालेल्या उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा त्यांचे प्रशिक्षण संपल्यानंतर पुढीलतीन वर्षात पोलीस शिपाई या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्तकरण्यास विनंती केल्यास अशा उमेदवाराकडुन प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्यासहीत वसुल करण्यात येईल. प्रशिक्षणावरचा खर्च म्हणुन प्रती महिना रु. २०००/- (प्रती मासीक दोनहजार फक्त) इतका प्रशिक्षणावरील खर्च वसुल करण्यात येईल. तसेच शासकिय सेवेचा राजीनामा स्विकारण्याच्या संबंधात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र. ३३/९२/८, दिनांक ०२ डिंसेबर १९९७ मधील सर्वसाधारण मार्गदर्शकसुचनेप्रमाणेतरतुदी बंधनकारक राहतील.

१०)	पोलीस शिपाई पदावर नियुक्त केलेल्या कर्मचारी त्याच्या नियुक्तीच्या पोलीस घटकातुन इतर पोलीस घटकात बदलीसाठी गृहविभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५ ब दिनांक २६ ऑक्टोंबर २०१७ मधीलतरतुदी लागु राहतील.

११)	शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर २०११ अन्वये सरळसेवा भरतीमध्ये ज्या उमेदवाराची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवारास, त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहुनतात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर, अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुनसहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणीसमितीकडुन

करुन घेणे आवश्यक आहे. उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणीकरण्यासाठी ऑनलाईन प्रस्ताव संबंधीत जात पडताळणी समितीकडेसादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची छायांकित प्रत या कार्यालयातसादर करावी. जात पडताळणी समितीने आपले जात प्रमाणपत्र अवैध ठरविले, तर आपणांस दिलेली नियुक्ती त्वरीत रद्दकरण्यात येईल आणि आपले विरुध्द महाराष्ट्र अनुसुचीत जाती, अनुसुचीत जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यातीलतरतुदीनुसार त्वरीत कार्यवाही  करण्यात येईल.

१२)  पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या या उमेदवारांना मुंबई पोलीस अधिनियम १९५१, मुंबई पोलीस मॅन्युअल १९५९, मुंबई पोलीस (शिस्त व अपील) नियम १९५६ व राज्य शासनाने वेळोवेळी विहीत केलेले अन्य नियम लागुहोतील.

१३)  पोलीस शिपाई पदावर नियुक्त उमेदवारांची सेवाज्येष्ठता महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१ अन्वये निश्चीतकरण्यात येईल.

१४)  शासकिय सेवेत रुजु झाल्यानंतर उमेदवारास भारतीय संविधानाप्रती निष्ठा व गोपनियतेची शपथ घ्यावी लागेल.

१५)  आपणांस नियुक्ती आदेश मिळाल्यानंतर सर्व प्रकारचा पत्रव्यवहार करतांनापोलीस आयुक्तालय, अमरावती शहरयेथील नियुक्ती आदेशात नमुदकरण्यात आलेल्या बक्कल क्रमांकाचा उल्लेख व वापर करण्यात यावा.

१६)  आदेश प्राप्त होताच आपण राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथेतात्काळहजर व्हावे. यापुर्वी कोणत्याही सेवेत नोकरीकरीत असल्यास नोकरीसोडण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीकरीता पुरेसा अवधी म्हणुन १० दिवस कालावधी देण्यात येईल. सदरचा विहीत मुदतीचा कालावधी संपल्यानंतर आपणांस पोलीस शिपाई पदावर रुजु करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

१७) उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजु होण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रवासासाठी प्रवास भत्ता मिळणार नाही.

**(गणेश शिंदे)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस